scholership letter


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

संकेतस्थळ : www.mcaer.org फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४३१७/ ३०५ दि.३१ जानेवारी,२०१९

## परिपत्रक

**विषयः- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज भरण्याच्या सुविधेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दि.२९/१/२०१९ पासून महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

यास्तव राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी महाडीबीटी पोर्टलवर **"All Schemes"** हया शिर्षकामधील **"Maharashtra Council of Agriculture Education and Research (MCAER)"** हया उपशिर्षकामध्ये वरील योजना अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी सदर पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज दाखल करावेत. सदर अर्ज दाखल करण्याचा अंतिम दि. २८ फेब्रुवारी,२०१९ असल्याने याबाबत विनाविलंब अर्ज दाखल करण्याची कार्यवाही करावी.

तसेच सर्व महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळावा म्हणून सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वरील कालावधीतच ऑनलाईन अर्ज दाखल करून घेण्यासाठी कँप आयोजित करावे. जेणेकरून कोणताही पात्र विद्यार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(शेखर गायकवाड)
**महासंचालक**

प्रति,

चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व विद्यालये / महाविद्यालयांचे प्राचार्य.

प्रतः- **कुलसचिव,** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरहू परिपत्रक कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करून द्यावे.